# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००५१८९**

**अपिलार्थी श्री. जयवंत रामचंद्र भंडारी**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
बोरीवली विभाग, बोरीवली पोलीस ठाणे, २ रा मजला, बोरीवली (प.), मुंबई ९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-११)**
बोरीवली पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, एस. व्ही. रोड,
बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.०७.२०२१**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०९.२०१९ | ०१.११.२०१९ | ११.११.२०१९ | १०.१२.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०.१२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी दि. १४.०७.२०२१ रोजी व्ही. सी. माध्यमाव्दारे सुनावणी घेण्यासाठी विनंती केली होती. तथापि, आयोगामध्ये त्या दिवशी व्ही. सी. माध्यमाव्दारे सुनावणीसाठी इंटरनेट सेवा बंद होती. या कारणामुळे सुनावणी घेता आली नाही. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

## आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ३१.०८.२०२१ रोजी दुपारी २.३० वाजता घेण्यात येईल.**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : २०.०७.२०२१

State Information Commission Greater Mumbai

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००५१८९**
**अपिलार्थी श्री. जयवंत रामचंद्र भंडारी**
**सुनावणी दिनांक : २४.०९.२०२१ (In continuation of order dt २०.०७.२०२१)**

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०.१२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे युक्तिवाद ऐकून घेतले. अपिलार्थी यांनी असे सादर केले की, अपिलार्थी संबंधीत व्यक्तीचे चुलत भाऊ आहे व त्यांचे शेजारी राहत होते. त्यांचे म्हणणे आहे की, शवविच्छेदन अहवालामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, संशयास्पद मृत्यु झालेला आहे व नैसर्गिक मृत्युऐवजी खुनाचा गुन्हा आहे. या कारणामुळे माहिती देत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, ज्या व्यक्तीचा मृत्यु झाला आहे त्यांच्या सख्या भाऊ यांनी लिहून दिले आहे की, माहिती कोणाला देऊ नये. या प्रकरणी शवविच्छेदन अहवालामध्ये मृत्युचे कारण दारुचे सेवन असे नमूद आहे व viscera रिपोर्टमध्ये "final cause of death due to pulmonary edema with alcohol consumption" असे नमूद करण्यात आले आहे. तपासाचे अंतीम रिपोर्ट कार्यकारी दंडाधिकारी (Executive megistate) यांना सादर करण्यात आले होते त्यांनी मृत्युचे कारण प्रमाणित केले होते व तपासाबाबत संशय नाही असे नमूद केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी वेळेची विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे १५ दिवसांत आयोगास सादर करावे व त्याची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना द्यावी. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे प्राप्त झाल्यानंतर त्यांना पाहिजे असेल तर त्यावर त्यांचे उत्तर आयोगाला सादर करु शकता.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.१०.२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : २७.०९.२०२१**

State Information Commission

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००५१८९**
**अपिलार्थी श्री. जयवंत रामचंद्र भंडारी**

**सुनावणी दिनांक : २८.१०.२०२१ (In continuation of order dt २७.०९.२०२१)**

सदर प्रकरणात अपिलार्थी यांनी सादर केलेला माहिती अर्ज, जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर, प्रथम अपील, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश व द्वितीय अपीलाबाबतची पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे :-

२. अपिलार्थी यांनी दि. २०.०९.२०१९ च्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहितीची विचारणा केली आहे :-

"श्री.महेश गोविंद केणी हे दि. २७.१२.२०१२ रोजी मयत झालेल्या असून त्यांचा दि. २७.१२.२०१२ त्याचा मृत्युचा पोलीसांचा पुर्ण अहवाल मिळण्याबाबत सोबत मृत्युपत्र जोडत आहे."

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या वरील माहिती अर्जास अनुसरुन दि. ०१.११.२०१९ च्या पत्रान्वये, "अर्जदार यांनी मागितलेली माहिती माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(त्र) अन्वये देता येत नाही" अपिलार्थीस कळविले आहे.

४. अपिलार्थीनी दि. ११.११.२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केला होता. सदर प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१२.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

"सदर अपिलाचे सुनावणी करिता, सहाय्यक माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक (प्रशासन), बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई श्री. आव्हाड तसेच अपिलार्थी श्री. जयवंत रामचंद्र भंडारी हे सुनावणीसाठी हजर आहेत.

दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकले. दस्तऐवज बघितले. जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे. अपील निकाली काढण्यात येत आहे."

५. अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०.१२.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यात त्यांनी अपीलाचे कारण म्हणून १ ते १० मुद्दे नमूद करुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम ८ (१)(डी)(जी) अन्वये माहिती नाकारली आहे. परंतु, माहिती नाकारण्याची सविस्तर कारणमिमांसा दिलेली नाही.

सदर द्वितीय अपील अर्जावर आयोगाने दि.१६.०७.२०२१ रोजी व्ही.सी.माध्यमाद्वारे सुनावणी आयोजित केली होती. परंतु, इंटरनेट सुविधा बंद असल्याने सुनावणी घेता आलेली नाही. तद्नंतर दि.२४.०९.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली त्यानुसार त्यांना १५ दिवसांत लेखी म्हणणे सादर करण्याच्या निर्देशासह पुढील सुनावणी दि.२८.१०.२०२१ रोजी घेण्यात येईल असे अंतरिम आदेश देण्यात आले.

उक्त अंतरिम आदेशास अनुसरुन सदर द्वितीय अपीलावर दि. २८.१०.२०२१ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही पक्षकार उपस्थित आहेत. तर प्रथम अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

६. सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे विषद केले की, अपिलार्थीने ज्या मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शवविच्छेदन अहवालाची माहिती मागितली आहे ती माहिती त्रयस्थ पक्षकाराची आहे. तसेच, त्या मृत व्यक्तीच्या सख्या भावाने सदर माहिती कोणाला देऊ नये, असे लेखी लिहून दिले आहे. याशिवाय, माहिती मागण्यामध्ये निश्चित व व्यापक सार्वजनिक हित साध्य होईल असे दिसून येत नाही. म्हणून, कलम ८ (१) (त्र) अन्वये माहिती नाकारली आहे. तसेच त्यांनी सदर अहवालाच्या सद्य:स्थितीबाबत मागील दि.२४.०९.२०२१ रोजीच्या सुनावणीवेळी विषद केलेल्या म्हणण्याचा पुनउर्च्चार केला.

..४/-

७.. सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी असे विषद केले की, त्यांनी ज्या व्यक्तीच्या मृत्यूच्या शवविच्छेदनाच्या अहवालाची मागणी केली आहे त्या मृत व्यक्तीचे ते चुलत भाऊ आहेत. त्यांच्या चुलत भावाचा मृत्यू संशयास्पद असल्याने त्यांना सदर शवविच्छेदन अहवाल पुढील न्यायिक कार्यवाहीसाठी आवश्यक आहे.

तसेच त्यांनी आयोगाच्या दि. २४.०९.२०२१ च्या सुनावणीतील निर्देशानुसार त्यांचे लेखी म्हणणे दि.०६.१०.२०२१ रोजी सादर केले आहे. त्यात त्यांनी प्रामुख्याने पुढील मुद्दे मांडले आहेत :-

1) ..........................
2) ..........................
3) It is mandatory duty of the concerned Investigating officer of Borivali Police Station to register the offence of Murder and to investigate the above matter and to bring the culprits to the book and a prosecute them in accordance with law who are found involved in above offence.
4) However no such offence was registered and for reasons best known to the concerned officer of Borivali Police station, the matter was closed without holding any investigation and without taking any action in the above matter.
5) ..........................
6) ..........................
7) The Police machinery is totally under the influence of the family members of the deceased and therefore they are trying to hide the truth from the Appellant.
8) If the information is furnished to the Appellant, then no loss prejudice or injury will be caused to the family members and if there is any material which warrants criminal prosecution then the above matter can be taken before court of law for issuing necessary directions for holding investigation in the matter and for taking action against the offenders in accordance with law However if there is nothing suspicious or if the enquiry held by the concerned officer of Borivali Police Station is satisfactory then there is no reason to worry by the family members of the deceased.
9) ..........................
10)..........................
11)..........................
12) In the facts and circumstances aforesaid, the above second appeal deserves to be allowed and the authorities below should be ordered and directed to furnished the entire Information about the suspicious death of cousin brother of the appellant and to disclose the details of action taken in the above matter along with their final report and the opinion of Executive Magistrate to enable the Appellant to consider the same on its own merits and if required to adopt legal process as permissible in law to adopt appropriate process of law to unfold the truth and to bring the culprits to the books so that they can be punished in accordance with law (In required)

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींनी दि. २०.०९.२०१९ च्या माहिती अर्जान्वये वरील परि क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.महेश गोविंद केणी यांच्या दि. २७.१२.२०१२ च्या मृत्यूसंदर्भातील पोलीसांचा पुर्ण अहवाल / शवविच्छेदन अहवाल मिळण्याची मागणी केली होती. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. ०१.११.२०१९ च्या पत्रान्वये वरील नमूद परि क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(त्र) अन्वये देता येत नाही, असे कळविले आहे.

तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.१२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

एकंदरीत या प्रकरणात अपिलार्थी यांनी एका मयत व्यक्तीच्या मृत्यू संदर्भातील पोलीसांचा पूर्ण अहवाल मागितला आहे व सदर अहवाल मागण्यासाठी त्यांनी ते मयत व्यक्तीचे चुलत भाऊ असून, मयत व्यक्तीचा मृत्यू संशयास्पद असल्याचे त्यांना शंका असल्याने सदर अहवाल त्यांना अपेक्षित आहे.

तसेच, सदर अहवाल मागणीच्या समर्थनार्थ त्यांनी वरील परि क्र.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लेखी म्हणणे सादर केले असून ते विचारात घेण्यात आले. त्यातील नमूद मुद्दा क्र.३, ४ व ७ येथील मुद्दे / म्हणणे मुळ माहिती अर्जातील मागणी व्यतिरिक्त / नवीन मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. सदर बाबी कलम २ (च) (त्र) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. तसेच, या बाबी पोलीस चौकशीच्या कार्यवाही संदर्भातील असून, आयोगाच्या कार्यकक्षेतील नाहीत. त्यामुळे त्यावर कोणतेही भाष्य करता येणार नाही. तर मुद्दा क्र.८ व १२ येथील मुद्दानुसार त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती दिल्यामुळे मयत व्यक्तीच्या कुटूंबाला कसलीही काळजी करण्याचे कारण नाही अथवा त्यांच्या जीवाला कोणताही धोका उद्भवणार नाही. याउलट या प्रकरणात संबंधित गुन्हेगार विरोधात पुढील कायदेशीर कार्यवाही करता येईल.

मात्र, जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती मागणारी व्यक्ती / अपिलार्थी हे मयत व्यक्तीच्या कुटूंबातील सदस्य नाहीत. त्यामुळे त्यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षकाराची ठरते. सदर माहिती देण्यात यावी किंवा कसे, यानुषंगाने ज्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे त्याचा सख्खा भाऊ यांनी दि.०१.११.२०१९ रोजी असे लिहून दिले आहे की, माझे मयत भाऊ यांच्या मृत्यूचे कागदपत्र किंवा मयत भावाची कोणतीही वैयक्तिक माहिती अर्जदार यांना पोलीसांनी देऊ नये.

तसेच, या प्रकरणातील शवविच्छेदन अहवालामधील मृत्युचे कारण दारुचे सेवन असे नमूद आहे व Viscera रिपोर्टमध्ये " Final Cause of death due to pulmonary edema with alcohol consumption" असे नमूद करण्यात आले आहे. तपासाचे अंतिम रिपोर्ट कार्यकारी दंडाधिकारी (Executive magistrate) यांना सादर करण्यात आले होते. त्यांनी मृत्यूचे कारण प्रमाणित करुन तपासाबाबत संशय नाही, असे नमूद केले आहे.

यावरुन असे दिसून येते की, मयत व्यक्तीच्या मृत्यू संदर्भातील शवविच्छेदन अहवाल व त्या अहवालावरील अंतिम कार्यवाही म्हणून कार्यकारी दंडाधिकारी यांचे प्रमाणीकरण झालेले आहे. म्हणजेच, पोलीस विभागाची कार्यवाही पूर्ण झाली आहे. ज्या प्रकरणात कार्यवाही पूर्ण झाली असेल तर त्या कार्यवाही संदर्भातील माहिती माहितीच्या अधिकारात उघड / प्रकट करण्यात कोणतीही अडचण राहत नाही.

परंतु असे असले तरी, सदर माहिती मागण्यामागे अपिलार्थी यांनी नेमके कोणते व कसे व्यापक सार्वजनिक हित साध्य होणार आहे याबाबत कोणतीही स्पष्ट कारणमिमांसा उघड न करता फक्त संशयित गुन्हेगाराच्या विरोधात पुढील कार्यवाही करण्यासाठी असे मोघम कारण दिले आहे. तर दुस-या बाजूला खुद्द मयत व्यक्तीच्या सख्या भाऊने सदर शवविच्छेदन अहवालाची माहिती अथवा मयत व्यक्तीची अन्य कोणतीही माहिती देण्यास हरकत घेतली आहे. म्हणून अपिलार्थींची मागणी मान्य करता येणार नाही. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**उपरोक्त विवेचनासह अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ११.०२.२०२२